# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १८.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १७/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३७८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,३७,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१७/११/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर व पोस्टे कळमनुरी येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ८८,१००/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१७/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये पोस्टे सेनगाव,कळमनुरी व हिंगोली शहर येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ६०.६ लिटर दारू असा एकुण १२,३८०/—रू. किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.१७/११/२०२२ रोजी भारतीय शस्त्र अधिनियम अंतर्गत हिंगोली जिल्हयात पोस्टे हिंगोली ग्रा. येथे ०२ तसेच हिंगोली शहर येथे ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन अवैध शस्त्र जप्त करण्यात आले असुन आरोपीतां विरूध्द भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**खुन** :—दिनांक १७/११/२०२२ रोजी फिर्यादी राजु गणपत घुगे रा.बासंबा यांचे फिर्यादी वरून पोस्टे बासंबा येथे कलम ३०२,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल होवुन आरोपीस ताब्यात घेतले असुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत.

**अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—** दिनांक १७/११/२०२२ रोजी फिर्यादी सुनिल ग्यानोजी अंभोरे वय ४० वर्ष व्य.नौकरी पोहवा ने.स्थागुशा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३७९ भादवी सह कलम ४८(७)(८) गौण खनीज अधी.प्रमाणे गुन्हा दाखल होवुन आरोपीस ताब्यात घेतले असुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

**किरकोळ दुखापत** :— पोस्टे बासंबा येथे ०२ तसेच पोस्टे कुरूंदा व पोस्टे वसमत शहर येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०४ ठिकाणी कलम ३२४,३२३,५०४,५०६ भादंवि प्रमाणे गुन्हे नोंद असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.